परिवहन समितीच्या सभा, शुक्रवार दि. ३१/०५/२०१९ रोजी दुपारी ०३:०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**उपस्थित सदस्य**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | **सभापती** |
| 2 | मा. सौ. विद्या योगेश मडावी | **सदस्या** |
| 3 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | **सदस्या** |
| 4 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | **सदस्या** |
| 5 | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | **सदस्या** |
| 6 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | **सदस्या** |
| 7 | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | **सदस्या** |
| 8 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | **सदस्य** |
| 9 | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | **सदस्या** |
| 10 | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | **सदस्य** |
| 11 | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | **सदस्य** |
| 12 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | **सदस्य** |

**अनुपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| 1 | **मा. श्री. प्रदीप वसंतराव पोहाणे<br>सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य** | **सदस्य** |

**उपस्थित अधिकारी**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | **श्री. शिवाजी जगताप** | **परिवहन व्यवस्थापक** |
| 2 | **श्री. हरिश दुबे** | **निगम सचिव** |

मा.सभापती, परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**<u>ठराव क्रमांक ४९</u> :–** खापरी डेपोतील जागेत सी.एन.जी. स्टेशन व वर्कशॉप करीता जागा उपलब्ध करणे, जागेचा दर निश्चित करणे, जागा देण्याचा कालावधी निश्चित करणेबाबत. नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या ५० स्टॅन्डर्ड डिझेल बसेस सी.एन.जी. इंधनावर परावर्तीत करणे व खापरी डेपो येथील जागेत सी.एन.जी. फ्युल स्टेशन व फ्युल डिसपेन्सीग फॅसिलीटी करीता मे. ट्रॅव्हल टाईम कार रेन्टल प्रा. लि. यांना डेपो करीता दिलेल्या जागेमधील जागा उपलब्ध करणेबाबत प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यात आलेली आहे व ५० बसेसचे सी.एन.जी. किटफिटमेन्ट करीता तसेच त्यापुढील कालावधीतील सी.एन.जी. किट व संबंधीत यांत्रिकी दुरूती व देखभाली यासाठी कार्यशाळेकरीता जागा उपलब्ध करून देण्याची मागणी मे रॉ मॅट इन्डस्ट्रीज प्रा. लि. यांनी केलेली आहे.

१. फ्युल स्टेशन व फ्युल डिसपेन्सीग फॅसिलीटी करीता १०५० चौ. मि. जागा व सी.एन.जी. देखभाल दुरूस्ती कार्यशाळा करीता ८१० चौ.मि. जागा मे. ट्रॅव्हल टाईम कार रेन्टल प्रा. लि. यांना आवंटीत केलेल्या जागेमधुन मे रॉ मॅट इन्डस्ट्रीज प्रा. लि. यांना उपलब्ध करून देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

२. एकूण १८६० चौ.मी. जागेचे मासिक भाडे रेडी रिकनेर प्रमाणे १८६० X ७७५० X ८% X १/१२ = रू. ९६१००/— प्रतिमाह + जी.एस.टी. निश्चिती करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

3- सदर जागेची उपलब्धतेचा कालावधी ०९ वर्षाकरीता निश्चित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून रॉ मॅट इन्डस्ट्रीज प्रा. लि. यांना प्रथम ५ वर्षाच्या भाडेपट्टयावर जागा देण्यात यावी. त्यांचे काम चांगले होत असून प्रदुषण कमी होत आहे असे आढळल्यास त्यांना पुढील ४ वर्षाची मुदतवाढ देण्यास तसेच भाडे रु. $1860 \text{ X } 7750 \text{ X } 2\frac{1}{2} \text{ X } \frac{1}{12}$ = Rs. 30032 + GST

प्रती माह प्रमाणे आकारण्यास समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ५०</u> :—** दि. २६/०४/२०१९ रोजी चे मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली शहर बस वाहतुकी संबंधी झालेल्या बैठकीमध्ये मे. डिम्टस् यांनी कॉमन मोबिलीटी कार्ड करीता व्हेरीफोन मशिन मधील सॉफ्टवेअर अपडेट करण्यासाठी त्यांचे तांत्रिक सहाय्यकाची आवश्यकता आहे. तथापी मनपा, नागपूर द्वारे त्यांचे देयकाची कुठलेही भुगतान झालेली नाही. भुगतान खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

| S.No. | INVOICE NO. | INVOICE DATE | ITEM | QTY. | AMT. (INR) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 33018110509 | 07. NOV 2017 | ETM MODEL Vx680 | 800 | 15413254.40 |
| 02 | 33018110510 | 07. NOV 2017 | Gang Charger | 80 | 723148.80 |

तथापी या मशिनच्या खरेदी संदर्भाने घोटाळा झाल्याचा आरोप वया संपुर्ण बाबींची चौकशी अतिरिक्त आयुक्त श्री. रिझवान सिद्दीकी यांचे मार्फत करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त (२) यांनी चौकशी अहवाल सभागृहाच्या समक्ष सादर केलेला असून मनपाची सर्व साधारण सभा ही दि. ३०/११/२०१८ व त्या पुर्वी महासभेमध्ये हा विषय क्र. २४४ ठेवण्यात आला व यावर निर्णय प्राप्त व्हावयाचा आहे.

मे. व्हेरीफोन इंडिया सेल्स प्रा. लि. यांचे देयकांचे भुगतान न झाल्याने कुठलेही सहकार्य करण्यास तयार नाही व त्यांनी दि. ०१/०५/२०१९ पासुन नागपूरातुन त्यांची फिल्ड सर्व्हीस स्टाफ आणि सपोर्ट सर्व्हीस देखील बंद केलेली आहे व त्यामुळे दैनंदिन ई.टी.एम. मशिन दुरूस्त करणे कठीण झाले आहे व याकरीता दि. २६/०४/२०१९ रोजीच्या बैठकीत मा. आयुक्त यांनी येत्या महासभेमध्ये हा प्रश्न निकाली निघेल असे लक्षात घेता मे. व्हेरीफोन इंडिया सेल्स प्रा. लि. यांचे ५० टक्के देयक अदायगी करण्याचे निर्देश दिले असुन ५० टक्के देयक रू. ८०,६८,२०१.२ अदायगी करीता मान्यता देण्याचा विषय समितीने विचारात घेवून महानगरपालिका महासभेच्या निर्णयाच्या अधीन राहून ५० टक्के देयक बाकी ठेवून उरलेल्या रक्कमेची अदायगी करण्यात यावी व देखभाल दुरूस्तीच्या संदर्भातील अटीशर्ती समितीसमक्ष ठेवण्यात याव्या यास समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ५१</u> :—** उत्तर नागपूर येथे शहरबस डेपोसाठी मौजा वांजरा, खसरा क्र. ५८/४ येथील भाडे तत्वावर घेतलेली अंदाजक ६,००० चौ.मी. जागेचे भाडे वसुल करणेबाबत.

मा. परिवहन समिती ठराव क्र. ५५ मधील सुचना दि. ०८/०५/२०१८ अन्वये मौजा वांजरा येथील ६,००० चौ.मी. जागे उत्तर नागपूर भागात शहर बस डेपोकरीता ऑक्टोबर २०१८ पासुन रू. ४,२७,७०३/— मासिक भाडे + जी.एस.टी. प्रमाणे घेण्यात

आलेली आहे. व सदर जागेवर मे. आर.के. सिटी बस ऑपरेशन प्रा. लि. यांना डेपो सुरू करण्यास वेळोवेळी खालील प्रमाणे पत्राद्वारे,

१) पत्र क्र. परिवहन/४९१/२०१८, दि. १३/०७/२०१८

२) पत्र क्र. परिवहन/५८९/२०१८, दि. ३१/०७/२०१८

३) पत्र क्र. परिवहन/१०३९/२०१८, दि. ०१/१२/२०१८

आदेशित करण्यात आले होते, पण आजपावेतो त्यांनी पटवर्धन डेपोमधुन हया जागेवर डेपो हस्तांतरीत केलेला नाही. त्यामुळे परिवहन विभाग, मनपाचे रू. ४,२७,७०३/— प्रतिमाह प्रमाणे भाडे स्वरूपात नुकसान होत आहे. आजपावेतो एकूण रू. ३४,२१,६२४/— एवढे भाडे मे. स्पॅन इटरप्रायजेस यांना देण्याचे आहे. तरी या रक्कमेची वसुली मे. आर.के. सिटी बस ऑपरेशन प्रा. लि. यांचे देयकातुन कपातीद्वारे वसुल करणे गरजेचे आहे. त्यांना आदेश देवून सुध्दा सदर जागेत आजपावेतो डेपोची सुरूवात करण्यात आली नाही. आजपावेतो ऑक्टोबर २०१८ चे भाडे मे. स्पॅन इटरप्रायजेस यांना प्रदान करण्यात आलेले असून माहे. नोव्हे. २०१८ ते मे. २०१९ पर्यंतचे भाडे प्रदान करावयाचे आहे.

प्रस्ताव सादर करण्यात येते की, सदर जागा आवश्यक नसल्यास भाडे करार रदद् करून आजपावेतो जागेचे एकूण भाडे रू. ३४,२१,६२४/— मे. आर.के. सिटी बस ऑपरेशन प्रा. लि. यांचे पासुन वसुल करून मनपाच्या खात्यात वळते करण्याकरीता मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन (१) शहरबस डेपोसाठी, मौजा वांजरा, ख. क्र. ५८/४ येथील भाडे तत्वावर घेतलेली अंदाजे ६००० चौ.मि. जागेपोटी मे. स्पॅन इंटरप्राइंजेस नागपूर यांना माहे ऑक्टोंबर २०१८ करिता अदा केलेली रु. ४,२७,७०३/— ही रक्कम मे. आर.के. सिटी बस सर्व्हीसेस प्रा. लि. पटवर्धन डेपो सिताबर्डी नागपूर यांचे मासिक देयकातुन एकमुस्त कपात करण्यात यावी, (२) ही जागा आवश्यक आहे किंवा नाही त्याप्रमाणे या जागेसाठी करण्यात आलेल्या करारनाम्याची सखोल तपासणी परिवहन विभागातील प्रशासकीय अधिकारी आणि उप अभियंता (स्थापत्य) यांनी करून संयुक्त तपासणी अहवाल १५ दिवसाचे आत परिवहन व्यवस्थापक यांचेकडे सादर करावा व हा अहवाल परिवहन व्यवस्थापक यांनी त्यांचे अभिप्रायासह समिती च्या पुढील सभेमध्ये सादर करावा, (३) वेळोवेळी सुचित करून सुद्धा या जागेचा ताबा मे. आर.के. सिटी बस सर्व्हीसेस प्रा. लि. पटवर्धन डेपो सिताबर्डी नागपूर यांनी अनेक अवास्तव कारणे दाखऊन आजपावेतो न घेतल्यामुळे व या जागेवर डेपोची सुरूवात न केल्यामुळे, मा. सदस्यांनी सुचित केल्यानुसार विभागीय तपासणी अहवालान्वये ही जागा भाडे तत्वावर घेण्याकरिता करण्यात आलेला करार रद्दबातल करण्याची कार्यवाही, व (४) माहे नोव्हेंबर २०१८ ते मे. २०१९ या ७ महिन्याचे एकुण भाडे रु. २९,९३,९२१/— आणि ऑक्टोंबर २०१८ या १ महिन्याचे मे. स्पॅन इंटरप्रायजेस, नागपूर यांना दिलेले भाडे रु. ४,२७,७०३ असे एकुण ८ महिन्याचे भाडे रुपये ३४,२१,६२४/— मे. आर.के. सिटी बस ऑपरेशन प्रा. लि. यांचेकडून विभागीय चौकशी अहवालातील निर्णयानुसार वसुल करण्याची कार्यवाही करण्याच्या सुचनेस समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ५२</u> :— नागपूर महानगरपालिकेने कॉमन मोबिलीटी कार्डचा वापर करण्यास सहमती दर्शविली असून महामेट्रो यांनी स्टेट बॅक ऑफ इंडिया बरोबर करारनामा केलेला आहे. हया मोबीलीटी कार्डचा उपयोग शहरातील नागरिकांना मेट्रो, बस, फिडर, पार्किंग, बाईक शेअरींग इ. करीता होणार असून स्टेकहोंल्डर कमेटीच्या दि. २९/०३/१९ च्या सभेत देखील हा विषया संदर्भात चर्चा करण्यात आली.

सध्या परिस्थितीत परिवहन विभाग नागरिकांना खालील तीन प्रकराचे कार्ड देत आहेत. (१) कॅश कार्ड (२) विद्यार्थी सवलत कार्ड (३) मासिक पास यापैकी फक्त कॅश कार्ड हे कॉमन मोबिलीटी करीता उपलब्ध करण्यात येईल.

स्टेट बॅक ऑफ इंडिया याकरीता ४ टक्के कमिशनची मागणी केलेली असून ह्या ४ टक्के रक्कमेबाबत निर्णय घेण्याचा तसेच करारनामा करण्याचा अधिकार मा. आयुक्त, मनपा यांना देण्याबाबत परिवहन समिती समक्ष सदर प्रस्ताव ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक ५३ :—** मा. परिवहन समिती सदस्य व विभागातील अधिकारी यांच्या ०४ दिवसीय दि. ०२/०१/२०१९ ते ०६/०२/२०१९ या कालावधी मधील दिल्ली स्थित डिम्स् कार्यालय, दिल्ली शहरातील आर.के.सिटी बस सर्व्हिसेस यांच्या माध्यमातून चालविण्यात येणारी दिल्ली शहरबस सेवा इ. करीता आयोजित करण्यात आलेला अभ्यास दौऱ्याची कार्योत्तर मंजुरी व झालेल्या रु. ४,९८,८३५/— च्या खर्चास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक ५४ :—** नागपूर महानगरपालिका परिवहन समिती सभा दि. ०६/०२/२०१९ अन्वये आपली बस मध्ये कार्यरत वाहकांकडून एक बिनातिकीटते ५ बिनातिकीट दोषी वाहकास प्रत्येकी एक बिनातिकीट रू. १,०००/—दंड आकारण्यात येत आहे. मा. आयुक्त यांनी स्टेकहोल्डरच्या बैठकीत ही दंडाची रक्कम दुप्पट करण्याबाबत सुचित केले. तसेच ते ज्या कंत्राटदाराकडे काम करित आहेत त्यांचेकडुन देखील प्रत्येकी रु. १०००/— दंड आकारण्यात यावा. वाहक/चालक कर्तव्यावर असतांना मोबाईल फोन चा वापर करीत असुन चालकांना/वाहकांना तसेच कंत्राटदारांना देखीलकार्यरत असतांना मोबाईल वापरण्यात देखील याबाबत वारंवार सुचना दिल्यापरंतु या संदर्भात कंत्राटदारांनी कोणते ही ठोस पावले उचलेले नाही करीता बस तपासणी दरम्यान वाहक/चालक यांचे जवळ मोबाईल आढळल्यास त्यांचे कडून रू. १,०००/— तसेच त्यांचे कंत्राटदार ऑपरेटर यांचेकडून रू. २,०००/— प्रति प्रमाणे दंड आकारण्यात येईल. त्याचप्रमाणे कोणत्याही बस मध्ये जर वाहक/चालक यांचेकडे मोबाईल आढळल्यास त्यामार्गावरील आय.बी.टी.एम. कंपनीचे तपासणीक चमु ज्यांनी त्या बसची तपासणी केली यांचेकडुन प्रत्येकी रू. १,०००/— दंड प्रत्येकी. सदर दंड आकारण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक ५५ :—** नागपूर शहराकरीता ''चलो'' मोबाईल ॲप हा पॅसेंजर इन्फर्मिेशन सिस्टिम साठी कार्यान्वित करणेबाबत मे. झोपहोप टेक्नॉलोजी प्रा. लि. यांनी स्पष्ट केले की, हा ''चलो'' ॲप कार्यान्वित करण्याकरीता महानगरपालिकेवर कुठलाही आर्थिक भार राहणार नाही, तसेच याकरीता लागणारे सर्व कॅपिटल कॉस्ट व ऑपरेशनल कॉस्ट ही मे. झोपहोप टेक्नॉलोजी प्रा. लि. हे त्यांचे स्वत: चे खर्चा ने करणार आहेत. ही कार्य पध्दती नियमित चालण्या करीता व नागपूर महानगरपालिकेस, या व्यवस्थेमध्ये अवाजवी कारणास्तव यासेवेत खंड पडु नये म्हणुन बॅक गॅरंटी सुध्दा देण्याचे मान्य केले आहे. तसेच मे. झोपहोप टेक्नॉलोजी प्रा. लि. यांचे अन्य कुठलेही प्रोडक्ट महानगरपालिकेला घ्यावयाचे नाही. अर्थात ई—तिकीटींग आणि आटोमेटेड फेअरकलेक्टींग सिस्टिम पुर्वपार सुरू असल्याने महानगरपालिकेच्या अंतर्गत संपुर्ण बस वाहनताफ्या वर संपुर्णपणे नियंत्रण व रिअलटाईम डाटा शहरातील नागरिकांना उपलब्ध होईल.

या ''चलो'' ॲपचे खालील वैशिष्टये आहेत. ट्रिपप्लॅनर अंतर्गत अंतर्भुत आहे.

अ) प्रवाश्याला ॲन्ड्रॉईड मोबाईल संचावर संपुर्ण शहर बस मार्गाचे विवरण उपलब्ध.

ब) प्रवाशी घरीबसून ''चलो'' ॲप संचालित करू शकतो, तसेच त्याला जायचे ठिकाणा साठी जवळील बस थांब्याची माहिती.

क) बस थांब्यावरून जाण्याऱ्या बसेस अंतर्गत थांब्याचे नाव टाकल्यास त्याला सदर मार्गावरच्या बसेस क्रमांकाची माहिती उपलब्ध होते. तसेच प्रवासाकरीता किती वेळ लागेल व किती थांबे असतील यासह प्रवास भाडे याबाबतची माहिती उपलब्ध होते.

या ॲप करीता मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदर ॲप कार्यान्वित करण्यात येईल बसेस या ॲप करीता मनपाला कोणताही खर्च येणार नाही. चलो ॲप नागपूर शहरातील नागरिकांकरीता कार्यान्वित करण्यास मे. झोपहोप टेक्नॉलोजी प्रा. लि. यांना मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून या ॲपची जाहिरात शहर बसेस मध्ये छोटे स्टिकर लावून करण्यात यावी जेनेकरून संबंधीतांना याची माहिती उपलब्ध होऊ शकेल या मा. सभापती यांनी केलेल्या सुचनेसह समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ५६</u> :—** के.डी.के. कॉलेज व सिताबर्डी डी.पी. रोड येथे सदर्हु वॉटर ए.टी.एम. मशिन ही नमुद स्पेसिफीकेशननुसार प्राप्त होऊन ''100 LPH Natural Zeolite Filter based water ATM" पुर्व नागपूरातील नंदनवन परिसरात के.डी.के. कॉलेज समोरील बस स्टॉपजवळ लावण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे अजुन एक वॉटर ए.टी. एम. मशिन देखील मोरभवन येथे लावण्याचे प्रस्तावित आहे. या दोन्ही वॉटर ए.टी.एम. लावणाचा तसेच त्यांचे भुगतान रु. १२,०३,६००/— प्रती ए.टी.एम. प्रमाणे मंजुर करण्यास तसेच खालील नमुद परिवहन समिती सदस्य/सदस्या यांनी वॉटर ए.टी.एम. लावण्याबाबत निवेदन दिले आहे. त्या अनुसार : —

मा.सौ.अभिरूचि रागगिरे, सदस्या परिवहन समिती—शांतीनगर घाटाजवळील चौकात
मा. सौ. अर्चना पाठक, सदस्या परिवहन समिती — अनंतनगर बस स्टॉप जवळ
मा. सौ. मनिषा धावडे, सदस्या परिवहन समिती — छापरूनगर चौक

उक्त मागणीनुसार व यापुढे येणाऱ्या इतर मा. परिवहन समिती सदस्य यांच्या प्राप्त निवेदनाप्रमाणे जी.एस.टी धरून प्रत्येकी रु. १२,०३,६००/— प्रती वॉटर ए.टी.एम. मशिन लावण्यास मा. परिवहन समिती सदस्य यांच्या प्राप्त झालेल्या व यापुढेही येणाऱ्या मागणीनुसार ए.टी.एम. मशिन लावण्यास आणि त्यासाठी होणाऱ्या एकंदरीत खर्चास अर्थसंकल्पातील प्रावधानाच्या अधीन राहुन मा. सभापती परिवहन समिती यांनी सन २०१८—१९ च्या अर्थसंकल्पात उल्लेख केल्यानुसार नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत मे. जोसेब इंडिया प्रा.लि., पुणे. जे या मशिनचे एकमेव उत्पादक आहे, त्यांचेकडुन ही योजना राबविण्यास सर्व परिवहन समिती सदस्यांनी प्रस्ताव सादर करावा आणि या विषयात नविन वाटर ए.टी.एम. लावण्याचे संपुर्ण अधिकार मा. सभापती यांना देण्यास समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ५७</u> :—** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २५ (५) अन्वये परिवहन समितीच्या १२ सदस्यांपैकी निम्मे ६ सदस्य जे निवृत्त होतील त्यांची नावे निश्चित करण्याचा प्रश्न समितीने विचारार्थ घेतला

सदर विषय आचार सहिता असल्याकारणाने मे २०१९ मध्ये घेण्यात येत आहे.

निगम सचिवः— मा.सभापती महोदय, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 25 (5) अन्वये परिवहन समितीचे जे 12 सदस्य आहेत त्यापैकी निम्मे 6 सदस्य हे प्रत्येक दुस—या वर्षी या समितीतून निवृत्त होतील. परिवहन समिती सदस्यांचा दोन वर्षाचा कार्यकाळ असतो. त्यानुसार आता 12 सदस्यांपैकी 6 सदस्य निवृत्त करावयाचे आहेत. कलम 25 उपकलम (6)

नुसार परिवहन सभापती यांना अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. त्यानुसार चिठ्ठया काढून या सदस्यांचे नाव निश्चित करावयाचे आहे. यासाठी 12 चिठ्ठया तयार करण्यांत आल्या असून त्यात 6 कायम व 6 चिठ्ठया निवृत्त आहे.

(त्या सर्व चिठ्ठया परिवहन समिती सदस्यांना दर्शविण्यांत आल्या. यानंतर या सर्व चिठ्ठया सर्वासमक्ष योग्य घडी करून पारदर्शक डब्यामध्ये टाकून सरमिसळ करण्यात आल्या. या सर्व प्रक्रियेची व्हिडीओग्राफी करण्यात येत आहे.)

निगम सचिवः– मा.सभापती महोदय, प्रत्येक सदस्याला या डब्यामधून एक चिठ्ठी काढावयाची आहे. चिठ्ठी काढल्यानंतर त्या चिठ्ठीवरती आपले नाव आणि स्वाक्षरी करावयाची आहे. त्यानंतर ती चिठ्ठी मा. सभापती यांना द्यावयाची आहे. मा.सभापती त्या चिठ्ठीवर स्वाक्षरी करतील. त्यानंतर निवृत्त आणि कायम असणारे सदस्याच्या नावाची मा. सभापती घोषणा करतील. मा.सभापती यांनी प्रक्रियेला सुरूवात करावी.

मा.सभापती यांनी उपस्थित असलेल्या सदस्यांच्या क्रमवारीनुसार चिठ्ठया पारदर्शक डब्यामधुन काढण्याचे सदस्यांना सुचविले. पारदर्शक डब्यामधुन चिठ्ठया काढण्यास सुरूवात करण्यात आली.

निगम सचिवः– मा.सभापती महोदय, परिवहन समितीच्या 6 सदस्यांची निवृत्त होण्याची प्रक्रिया आहे त्यामध्ये चिठ्ठया काढण्याची प्रक्रिया समाप्त झाली आहे. मा.सभापती महोदय यांना विनंती करतो त्यांनी याचा निकाल जाहीर करावा.

शेवटी मा.सभापती यांनी कायम सदस्य आणि निवृत्त झालेल्या सदस्यांच्या नावाची घोषणा केली.

**कायम सदस्य**

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | सदस्य |
| 2. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 3. | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 4. | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 5. | मा. श्री. नितिश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 6. | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |

**निवृत्त सदस्य**

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. प्रविण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 2. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 3. | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 4. | मा. सौ. विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 5. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 6. | मा. श्री. नरेन्द्र नत्थुजी वालदे | सदस्य |

उपरोक्त निवृत्त सदस्यांच्या जागा भरण्याकरिता परिवहन समितीने महानगरपालिकेच्या आगामी महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्याची शिफारस केली.

**ठराव क्रमांक ५८** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
परिवहन समिती
महानगरपालिका,नागपूर